# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २१/०७/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

## उमरेड पोलीस पथकावर जीवघेणा हल्ला करणा—या आरोपींना गोध्रा, गुजरात येथुन अटक

| अ.क्र | पो.स्टे. | उमरेड नागपुर जिल्हा ग्रामीण. |
|---|---|---|
| १ | अप. क्र.व कलम | (१). ३९२/२०२२ कलम— ३०७,३५३,३३२,१४३,१४८,१४९ भादवी<br>(२) ३९३/२०२२ कलम— ४५७,३८०,३४ भादवी |
| २ | घटनास्थळ | एम.आय.डी.सी. ते मौजा मांडवा जंगल परिसर |
| ३ | घटना .ता.वेळ | २३.०६.२०२२ चे ०१.४५ वा. ते ०२.३० वा. दरम्यान |
| ४ | गुन्ह्यात वापरलेले वाहन | सहा चाकी कन्टेनर क्र. GJ—१७ XX—०९७६ |
| ५ | चोरीस गेलेला माल | फ्लीपकार्ट गोडाउन मधील १०९ पार्सल व सी.सी.टी.व्ही.चा डी.व्ही.आर.<br>एकुण किमती— ७१,००० रू. |
| ६ | नाव अटक आरोपी | (१) उस्मानगनी मोहम्मद ईब्राहीम कॉफीवाला वय— ५५ वर्ष<br>(२) ईरफान उर्फ जाफरु फारुक बांडी वय— ४० वर्ष,दोन्ही रा— गोध्रा गुजरात |
| ७ | अटक ता. वेळ | आरोपी क्र. ०१ दिनांक— १९.०७.२०२२<br>आरोपी क्र. ०२ दिनांक— १५.०७.२०२२ |
| ८ | फरार आरोपी | (१) उमर उर्फ पंपोई अब्दुल सत्तार जादी (२) पव्या नाईक ,<br>(३) लंगड्या नावाचा ईसम सर्व रा— गोध्रा गुजरात |

दिनांक— २३.०६.२०२२ रोजी चे रात्री ०१.०० वा. दरम्यान पो.स्टे. उमरेड येथील डी.बी. पथकाचे प्रमुख पोउपनि.बद्दुलाल पांड़े, पो.ना./४८६ प्रदिप चवरे, पो.ना./६९५ तिलक रामटेके हे डायल ११२ वाहनावर पेट्रोलींग करीता असताना एमआयडीसी परीसरात एक कंटेनर संशयीत रित्या दिसला व त्या मधुन एक पांढ-या रंगाचे बोरे बाहेर फेकतांनी एक इसम दिसला. त्यावरून त्यांना संशय आल्याने पो.उपनि.पांडे व पथक त्यांना तपासण्याकरीता गेले असता. संशयीत ईसम हे ती बोरी त्याच ठिकाणी फेकुन पळुन कन्टेनरसह पळुन गेले. पोउपनि. पांडे यांनी सोबत असलेले कर्मचारी पो.ना./६९५ तिलक रामटेके यांना सदर बोरी ची शहानीशा करण्यास त्याच ठिकाणी थांबवुन कन्टेनरचा पाठलाग सुरु केला. अंदाजे १८ की.मी. पाठलाग केल्यानंतर कन्टेनर चालकाने ग्राम मांडवा परीसरातील घनदाट जंगलामध्ये कन्टेनर अचानक थांबवीला व वेगाने तो कन्टेनर रीव्हर्स घेवुन पोलीसांना जिवे मारण्याच्या उद्देशाने वाहनाला जोरदार धडक देवुन वाहनास उडवुन दिले. पोउपनि.पांडे व पो.ना./ चवरे हे वाहनाचा दरवाजा उघडुन वेळीच खाली उतरल्याने त्यांचा जिव वाचला. त्याचवेळी कन्टेनरमधील ईतर ४ ईसमाने अचानक खाली उतरून पोउपनि. पांडे यांचे वर लोखंडी रॉडने जिवघेणा हल्ला केला. पोउपनि. पांडे यांनी त्यांचा प्रतीकार करताना गंभीर जखमी झाले. आरोपी हे अंधाराचा फायदा घेवुन कन्टेनरसह पळुन गेले होते. आरोपीतांनी फ्लिपकार्ड कंपनीचे गोडाऊन फोडुन त्यातील माल चोरून घेऊन जात होते. फीर्यादी नामे अंकीत भारत मुन, वय— २६ वर्ष, रा— अड्यळवाले ले—आउट उमरेड, प्रबंधक फ्लीपकार्ट गोडाउन उमरेड यांच्या गीरड रोड उमरेड येथील फ्लीपकार्ट च्या गोडाउनचे कोणीतरी अज्ञात चोराने शटर तोडुन आत मध्ये प्रवेश करून दुकानात ठेवलेले एकुण—७१,००० रू. चा मुद्देमाल (पार्सल) चोरी केला होता. या दोन्ही घटनेच्या अनुषंगाने पो.स्टे. उमरेड

येथे अनुक्रमे (१) अप. क्र. ३९२/२०२२ कलम– ३०७,३५३,३३२,१४३,१४८ भादवी, (२) अप. क्र. ३९३/२०२२ कलम– ४५७,३८० भा.द.वी. दिनांक– २३/०६/२०२२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. कन्टेनर मधील लोकांनी फेकलेल्या पांढ–या –या रंगाच्या बोरीची पाहणी केली असता त्यामध्ये फ्लीपकार्टच्या दुकानातील साहीत्य आढळुन आले वरून वरील नमुद गुन्ह्यातील आरोपी हे एकच असल्याचे निष्पन झाले होते.

दोन्ही गुन्हे अतीशय गंभीर स्वरुपाचे असल्याने दोन्ही गुन्ह्याचा लवकरात–लवकर उलगडा करण्यासाठी पो.स्टे. उमरेड येथे डी.बी. व ईतर तीन पथके तयार करण्यात आली. पथकांनी अतिशय गोपणीय रित्या व कर्तव्य तत्परतेने अतिशय मेहनतीने सदर कंटेनरला नंबर प्लेट नसतांना तांत्रीकरित्या सदर कंटेनर हा गुजरात राज्यातील असल्याचे निष्पन्न करून त्याचा नंबर सुध्दा निष्पन्न केला. व त्यावरून सदरचा कंटेनर हा गुजरात राज्यातील गोध्रा येथील असल्याचे निष्पन्न केले.

गुन्ह्यात वापरलेला कन्टेनर व आरोपींचा शोध घेणे करीता उमरेड येथील डी.बी. पथक हे गुजरात गोध्रा येथे रवाना झाले. सदर कन्टेनरचा मालक उस्मानगनी मोहम्मद ईब्राहीम कॉफीवाला वय ५५ वर्ष रा. गोध्रा हा असुन त्याचे सोबत सदर गुन्ह्यात ईरफान उर्फ जाफरु फारुक बांडी वय ४० वर्ष, उमर उर्फ पंपोई अब्दुलसत्तार जादी, पव्या नाईक व एक ईतर ईसम असल्याचे निष्पन्न झाले.त्यावरून ईरफान उर्फ जाफरु फारुक बांडी यास त्याच्या राहते घरून त्याब्यात घेण्यात आले तसेच कन्टेनरचा मालक व गुन्ह्यातील मुख्य आरोपी उस्मानगनी मोहम्मद ईब्राहीम कॉफीवाला यास मलाजखंड जिल्हा बालाघाट येथुन ताब्यात घेण्यात आले. अटके दरम्यान दोन्ही आरोपी यांनी आपल्या ईतर तीन साथीदारांच्या मदतीने वरील दोन्ही गुन्हे केल्याचे कबुल केले.

आरोपीतांनी वरील दोन्ही घटना करून पळुन जाताना मलाजखंड बालाघाट मध्यप्रदेश येथे ज्वेलर्स दुकान फोडुन ७० कीलो चांदी चोरी केली होती.गुन्ह्यात वापरलेला कन्टेनर हा आरोपीतांनी कापुन नष्ट केला आहे.यातील अटक आरोपी यांच्यावर यापुर्वी खुन, खुनाचा प्रयत्न चोरी,दंगा, घरफोडी, शासकीय कर्मचा–यावर हल्ले, जनावराची अवैध्य वाहतुक ईत्यादी प्रकारचे गंभीर गुन्हे दाखल आहे. आरोपी नामे उस्मानगनी मोहम्मद ईब्राहीम कॉफीवाला हा गुजरात येथील सन २००२ मध्ये झालेल्या गोध्रा हत्याकांड (साबरमती एक्सप्रेस जळीत कांड, गोध्रा रेल्वे अपराध क्रमांक–०९/२००२) मधील आरोपी असुन ०८ वर्ष मध्यवर्ती कारागृह साबरमती येथे होता. सदर आरोपी ह राहत असलेल्या भागात आरोपी व त्यांचे ईतर साथीदार हे ताटपत्री गॅग या नावाने कुख्यात असुन मालवाहु वाहनातील ताटपत्री कापुन मुद्देमाल चोरून नेण्याचे गुन्हे करण्याचे सवईचे आहेत.अटक आरोपीतांनी अश्याच पद्धतीचा एका गुन्हा आंध्र प्रदेश येथे केल्याचे सध्या कबुल केले आहे. ईतर तीन आरोपीतांच्या शोधा करीता गोध्रा येथे पोलीस पथक पाठविण्यात येत आहे.तपासा दरम्यान ईतरही गुन्हे निष्पन्न होण्याची शक्यता आहे.

नमुद गुन्ह्याची कामगीरी मा. पोलीस अधिक्षक श्री. विजयकुमार मगर, अप्पर पोलीस अधिक्षक श्री. राहुल माकणीकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. भिमराव टेळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद घोंगे, स.पोनि. शरद भस्मे, पो.उप.नि.दिनेश खोटेले, पो.उप.नि. प्रशांत खोब्रागडे, पो.ना.ध्र प्रदिप चवरे, राधेश्याम कांबळे, पंकज बट्टे , रविंद्र जाधव, नितेश राठोड, प्रकाश गाथे, प्रदिप ठाकरे,तिलकचंद रामटेके, उमेश बांते सर्व नेमणुक पो.स्टे. उमरेड यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर